स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड—४३१ ६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMA NAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED - 431606, MAHARASHTRA STATE, INDIA
Established on 17 September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A'Grade

25
1994 - 2019
SILVER JUBILEE YEAR

**Estate Department**

संदर्भ : संपदा/General file/२०१९-२०२०/ 385 दिनांक : १६.०९.२०१९

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व शैक्षणिक संकुले, प्रशासकीय विभाग, उपकेंद्र लातूर, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली, उपकेंद्र, परभणी आणि कै.उत्तमराव राठोड आदिवासी संशोदर केंद्र, किनवट यांना कळविण्यात येते की, फर्निचर, संगणक साहित्य, उपकरणे, स्टेशनरी साहित्य, विद्युत साहित्य, क्रिडा साहित्य, रसायणे व काच सामान इत्यादी साहित्याचे मागणी लेखा संहिता नियमातील **Appendix-VII** नमुना प्रमाणे स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोटसह प्रशासकीय मान्यता घेवून तशी मागणी पूढील कार्यवाहीस्तव संपदा विभागात पाठविण्याबाबत दि.२५.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये (परिपत्रक क्र.संपदा/२०१८-१९/६९७ दि.२५.०२.२०१९) कळविण्यात आले होते. परंतु सदर परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे लेखा संहिता नियमातील **Appendix-VII** नमुना प्रमाणे स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोटसह प्रशासकीय मान्यता न घेता मागणी संपदा विभागात पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या विषयी दि.१४.०९.२०१९ रोजी संपन्न झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीत विषय क्र.७ प्रमाणे **साहित्याचा स्टॉक मागवून घेण्यात येवूनच खरेदीची कार्यवाही करावी. तसेच कुठलीही मागणी स्टॉक व्हेरीफिकेशन शिवाय स्विकारु नये. स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोर्ट विभागाने सादर केला नाही तर त्यावर कार्यवाही करता येणार नाही असे परिपत्रक सर्व विभागाना पाठविण्यात यावे. तसेच स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोर्ट प्राप्त न झाल्यामुळे होणा-या दिरंगाईस वित्त व लेखा विभाग जबाबदार राहणार नाही असे परिपत्रकात नमुद करावे अशा आशयाचा ठराव पारित करण्यात आलेला आहे.**

तसेच दि.०५.०९.२०१९ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील विषय क्र.२ अन्वये विभागाकडून मागणी सोबत सदरील साहित्याचे स्टॉक व्हेरिफिकेशन प्राप्त झाल्याशिवाय कोणतीही खरेदी करण्यात येवू नये. यासंदर्भाने परिपत्रकान्वये पुनश्च सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागाना कळवावे असा ठराव पारित केलेला आहे.

तरी, यापूढे कोणत्याही साहित्याची मागणी करत असतांना लेखा संहिता नियमातील **Appendix-VII** नमुना प्रमाणे स्टॉक व्हेरिफिकेशन रिपोर्टसह प्रशासकीय मान्यता घेवून मागणी संपदा विभागात पाठविण्यात यावी. असे न केल्यास खरेदीची पूढील कार्यवाही होणार नाही. तसेच त्यामुळे होणा-या दिरंगाईस वित्त व लेखा विभाग जबाबदार राहणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

वित्त व लेखाधिकारी

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:

१) मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा.प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा.कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
४) मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
५) मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
६) मा.संचालक, उपकेंद्र, लातूर
७) मा.प्राचार्य, न्यु मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली
८) मा.संचालक, उपकेंद्र, परभणी
९) मा.समन्वयक, कै.उत्तमराव राठोड आदिवासी संशोदन केंद्र, किनवट
१०) सिस्टिम एक्सफर्ट, यु.जी.सी.सेल, प्रस्तुत विद्यापीठ- सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

Phone No.: +91 2462 229526 University website: srtmun.ac.in Email: estate.srtmun@gmail.com